नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी शपथेवर सुरू</u>**

माझे नाव :- संजय तुळशीराम कुऱ्हाडे,
माझे वय :- ३७ वर्षे,
व्यवसाय :- शिपाई, नगरपरिषद, मानवत.
राहणार :- मानवत, ता. मानवत, जि. परभणी.

---

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास श्री. डी. एस. नाटकर सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत</u> :–**

फिर्यादी माझी आई आहे. आमचे शेत गट क्र.६९ स्मशानभुमी, मानवत येथे आहे. माझ्या परिवारात मी, माझी आई, दोन चुलते, माझे वडील, भाऊ दिलीप व त्याची पत्नी उर्मिला असे आहेत. घटना ०२ वर्षापुर्वी दुपारी ३.३० च्या सुमारास अरूणा कुऱ्हाडे यांच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी मी माझ्या घरी होतो. माझी आई व भावजय उर्मिला ह्या आरोपीच्या घरी ''आम्हाला कापूस का वेचु देत नाही'' असे विचारण्याकरीता गेल्या होत्या. त्यावेळी आरोपी क्र.१ ने त्यांना ''धंदेवाली, छिन्नाल, तुझे दहा धगडे, तुला भोंगळे करून मारू'' अशी शिवीगाळ केली. त्यानंतर माझी आई तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला गेली. माझे घर घटनास्थळाच्या शेजारी असल्याने मला आरडाओरडा ऐकू आला व मी तिथे गेलो होतो. ज्या आरोपींनी शिवीगाळ केली, त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी ते न्यायालयासमक्ष हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. ए. जे. काळदाते यांच्यामार्फत सुरू</u> :–**

२) पोलीसांनी माझे बयाण नोंदवले होते. मला त्याची तारीख आठवत नाही. पोलीसांनी माझे बयाण घटनेच्याच दिवशी सायंकाळी ४ ते ५ च्या सुमारास नोंदवले होते. मी पोलीसांना जबाब देतेवेळी आरोपी क्र.१ ने त्यांना ''धंदेवाली, तुझे दहा धगडे, तुला भोंगळे करून मारू'' अशी शिवीगाळ केली, ही बाब सांगितली होती. सदरची बाब माझ्या जबाबात नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही. मी पोलीसांना जबाब देतेवेळी माझे घर घटनास्थळाच्या शेजारी असल्याने मला आरडाओरडा ऐकू आल्याने मी तिथे गेलो होतो, ही बाब सांगितली होती. सदरची बाब माझ्या जबाबात नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही.

३) माझे वडील नगरपरिषदेत नोकरीला होते. ते सन २०१४ मध्ये मयत झाले व त्यांच्या जागी मी नोकरीस लागलो. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील तुळशीराम,

नि.फौ.ख.क्र.११७/२०२४
शासन वि. अरूणा
**निशाणी क्र. २०**

आरोपी क्र.१ चे पती निवृत्ती व आरोपी क्र.२ चे वडील उत्तम हे सख्खे भाऊ आहेत. माझे वडील सर्वात मोठे भाऊ होते. उत्तम व निवृत्ती कुऱ्हाडे शेती करतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ चे पती निवृत्ती यांची मानसिक स्थिती बरोबर नसल्याने त्यांना औषधोपचार चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील, निवृत्ती व उत्तम कुऱ्हाडे हे त्यांचे लग्न झाल्यापासून विभक्त राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ चे वडील हे पेठ मोहल्ला, मानवत येथे राहतात आणि मी झारे गल्ली येथे राहतो.

४) मी सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.३० दरम्यान कर्तव्यावर असतो व त्यानंतर मी माझ्या घरी येतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, घटनेच्या दिवशी सुट्टी असावी. मला गट क्र.६९ मध्ये ०४ एकर शेती आहे. गट क्र.६३ मध्ये मला सव्वा तीन एकर शेती आहे. माझे घर आरोपी क्र. १ च्या घराला लागुन आहे. माझ्या आईच्या घराला लागुन प्रल्हाद माळसोनकर यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजूला बरीच घरे आहेत. माझ्या व आरोपी क्र.१ च्या घरासमोर सरकारी रस्ता असून तो वर्दळीचा रस्ता आहे. हे मला लक्षात नाही की, मी पोलीसांना माझा जबाब देतेवेळी माझ्या आईने मला दिलीप आला व आमचे भांडण सोडविले, असे सांगितले होते किंवा कसे.

५) हे म्हणणे खरे आहे की, आमच्या व आरोपींमध्ये गट क्र.६३ मध्ये मागील बऱ्याच वर्षापासून न्यायालयात वाद प्रलंबीत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ च्या घरापासून माझे घर दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६९ मधील जमीन उत्तम व निवृत्ती कुऱ्हाडे यांच्या नावावर असून सध्या सदर जमीन प्लॉटिंगची असून त्यांनी सदर जमीन आम्हांला देण्यास नकार दिला, म्हणून आम्ही आरोपींविरूध्द प्रस्तुतची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

ठिकाण : मानवत
दिनांक: १०/०३/२०२६

Digitally signed by PRANJASVI PHATALE
Date: 2026.03.20 17:10:21 +0530

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.